ePaper
शिवसेना फुटीनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचा नंबर?: रणजीतसिंह निंबाळकर



| वर्ष - 6 | अंक - 311 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पुणे मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात गंभीर तांत्रिक चूक
- पुणे-नाशिक महामार्ग मृत्यूचा सापळा
- पैसे वाटणे... ही तर काँग्रेस-राष्ट्रवादीची संस्कृती

www.mahaenews.com | रविवार, दि. 26 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आज मतदान; यंत्रणा सज्ज!

## »चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : प्रशासनाची तयारी

**।पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीच्या मतदानाच्या अनुषंगाने निवडणूक विभागामार्फत निवडणूक विषयक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या सेक्टर अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी तसेच सहायक अशा सुमारे ३ हजार प्रशिक्षणार्थींना निवडणूक निरिक्षक एस. सत्यनारायण यांच्या विशेष उपस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उप आयुक्त विठ्ठल जोशी आणि निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी तिसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण आज दिले.**

थेरगाव येथील स्व.शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे झालेल्या या प्रशिक्षण सत्रामध्ये मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष करावयाच्या कामकाजाबाबत तसेच साहित्य वितरणापूर्वी कर्मचाऱ्यांना विहीत नमुन्यातील माहिती भरताना घ्यावयाची काळजी, ईव्हीएम यंत्रातील तांत्रिक अडचणी कशा दूर कराव्यात, साहित्य स्विकारताना व जमा करताना काय काळजी घ्यावी याबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले.



यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित पाटील, शिरीष पोरेडी, शितल वाकडे, निवडणूक सहायक अधिकारी नागेश गायकवाड, माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी किरण गायकवाड, निवडणूक सहायक अधिकारी प्रशांत शिंपी, थॉमस नरोन्हा, ईव्हीएम यंत्र व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक बापू गायकवाड, पोस्टल मतदान कक्षाचे समन्वयक राजेश आगळे, समन्वयक सिताराम बहुरे, भेल इलेक्ट्रॉनीक्सचे तज्ज्ञ अधिकारी उपस्थित होते.

### टपाली मतदानाची सुविधा...

» **निवडणूकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांपैकी २४८ कर्मचाऱ्यांना टपाली मतदानासाठी फॉर्म वाटप करण्यात आले होते. त्यांच्यासाठी साहित्य वितरण ठिकाणी टपाली मतदान सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पहिल्या व दुसऱ्या प्रशिक्षणादरम्यान या कर्मचाऱ्यांना टपाली मतदानासाठीचे अर्ज देण्यात आले होते. त्यानुसार काही कर्मचाऱ्यांनी आज मतदानाचा हक्क बजावला. तसेच,** चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी यावेळी थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयांमध्ये १९५ क्रमांकाचे मतदान केंद्र 'सखी मतदान केंद्र' म्हणून तयार करण्यात आले आहे. या ठिकाणी महिला अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली असून त्या केंद्राची विशेष रचना तयार करण्यात आली आहे. रावेत येथील बबनराव भोंडवे शाळेमधील २३ क्रमांकाचे केंद्र तसेच वाकड येथील महापालिकेच्या प्राथमिक शाळेतील ३९५ आणि ४०५ क्रमांकाचे केंद्र आदर्श मतदान केंद्र (मॉडेल पोलिंग स्टेशन) म्हणून तयार करण्यात आले आहे.

प्रशिक्षणानंतर मतदान केंद्रावर आवश्यक असलेल्या निवडणूक साहित्याचे केंद्रनिहाय वाटप करण्यात आले. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे साहित्य उद्या दि. २६ फेब्रुवारी रोजी जमा करून घेतले जाणार आहे. मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने कर्तव्ये, जबाबदा-या आणि आवश्यक कामकाज याबद्दल या प्रशिक्षणामध्ये सविस्तर माहिती आणि सूचना देण्यात आल्या.

# बाईक टॅक्सीला परवानगी दिल्यास आंदोलन!

## »रिक्षाचालकांचा इशारा : शहरातील बैठकीत निर्णय

**।पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**महाराष्ट्र राज्यात विविध शहरांमध्ये ( PIMPRI NEWS ) बेकायदेशीररित्या बाईक टॅक्सी सुरू आहे सरकारची परवानगी न घेता मोबाईल एपपद्वारे बुकिंग करून बाईक टॅक्सी प्रवासी वाहतूक धोकादायक पद्धतीने होते म्हणून न्यायालयाने ते रद्द केले .**



राज्य सरकारने परिवहन संवर्गात नोंदणी केलेल्या वाहनाचे नियमन करून अग्रीगेटर म्हणून महाराष्ट्र राज्यामध्ये दुचाकीला परवानगी देण्यासाठी समिती नेमलेली आहे. यातून बाईक टॅक्सी परवानगी सुरू करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असून याचा तीव्र शब्दांमध्ये निषेध करत रिक्षा चालकांनी या विरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

कष्टकरी संघर्ष महासंघ महाराष्ट्र,सारथी चालक मालक महासंघ तर्फे आज बैठक घेऊन निषेध करण्यात आला.

यावेळी कामगार नेते काशिनाथ नखाते, इरफान चौधरी, दिनकर खांडेकर,अशोक पवार, आदीक बोऱ्हाडे,रामा कांबळे,राजू व्हणमाने,बालाजी भोसले, गुलाब बागवान, सहदेव व्हणमाने, फरीद शेख आदी उपस्थित होते.

> **“ महाराष्ट्र राज्यामध्ये रिक्षा चालकानी मोठ्या प्रमाणात आंदोलन करून बाईक टॅक्सीचा विरोधातील लढा यशस्वी केल्यानंतर राज्य शासनाच्या मनामध्ये वेगळीच भूमिका दिसते. रिक्षा चालकांचे वाटोळे करण्याचा प्रकार आहे. राज्यात दुचाकी संवर्गातील वाहनांना प्रवाशांच्या वाहतुकीसाठी परिवहन संवर्गात नोंदणी करून अग्रीगेटर म्हणून महाराष्ट्रात सेवा देण्यासाठी समिती स्थापन केलेले आहे. यासाठी माजी सनदी अधिकारी ( PIMPRI NEWS ) रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा प्रयत्न असून हे अत्यंत चुकीचे आहे.**
>
> **- काशिनाथ नखाते, कष्टकरी संघर्ष महासंघ.**

# पुणे मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात गंभीर तांत्रिक चूक

## » राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी यांचा दावा

**। पुणे । महाईन्यूज ।**

**राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केलेल्या पुण्यातील मेट्रोच्या कामात गंभीर तांत्रिक त्रुटी असल्याचा दावा केला आहे. हा दावा करताना त्यांनी अभियंत्यांनी लिहिलेल्या पत्रांचा आधार घेतला आहे. या सर्व बांधकामाचे ऑडिट करून तांत्रिक चुका दूर कराव्यात, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे.**





सुप्रिया सुळे यांनी आपल्या ट्विटर खात्यावर काही ट्वीट केले आहेत. या ट्वीट्समध्ये त्यांनी वनाज ते गरवारे कॉलेज या मेट्रोच्या मार्गादरम्यान बांधकामाच्या तांत्रिक त्रुटी असल्याचे सांगितले आहे. "प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केलेल्या पुणे मेट्रोच्या वनाज ते गरवारे कॉलेज या मार्गादरम्यान बांधकामाच्या काही गंभीर तांत्रिक त्रुटी राहिल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञ अभियंत्यांचे म्हणणे आहे," असे सुळे म्हणाल्या आहेत. "या मार्गावरुन भविष्यात लाखो प्रवासी दररोज प्रवास करणार आहेत. त्यांची सुरक्षितता लक्षात घेता या संपूर्ण बांधकामाचे तातडीने 'स्ट्रक्चरल ऑडीट' करुन या त्रुटी दूर करणे गरजेचे आहे. माझी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रजेश दिक्षित यांना विनंती आहे की कृपया याबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही करावी," अशी मागणीही सुप्रिया सुळे यांनी केली आहे.



# झेडपीच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या ९६४ जागा रिक्त

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्गच जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे उपलब्ध नसल्याची बाब उघडकीस आली आहे.

सद्यःस्थितीत झेडपीच्या आरोग्य विभागातील एकूण ९६४ पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांवर अपुऱ्या मनुष्यबळाअभावी उपचार कसे करायचे, असे आव्हान उपलब्ध कर्मचाऱ्यांपुढे आहे.

महिला आरोग्य सेविकांच्या सर्वाधिक ५८१ जागा रिक्त आहेत. जिल्हा परिषदेच्यावतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आरोग्य विभागाच्या सर्वसाधारण महिती अहवालातून ही बाब उघड झाली आहे.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांत विविध २१ प्रकारची पदे आहेत. या सर्व पदांच्या मिळून एकूण २ हजार १६७ जागा मंजूर आहेत. त्यापैकी सध्या ९६४ जागा रिक्त असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### पदनिहाय प्रमुख रिक्त जागा

**तालुका आरोग्य अधिकारी - ०५**
**वैद्यकीय अधिकारी(गट अ) १४**
**आरोग्य पर्यवेक्षक ०३**
**औषध निर्माण अधिकारी २८**
**आरोग्य सेवक महिला ५८१**
**आरोग्य सेवक (पुरुष) ३१६**
**प्रयोगशाळा तंत्रज्ञ ०४**
**आरोग्य सहायक (पुरुष) ०६.**
**अन्य (उर्वरित सर्व मिळून) ०७**
**एकूण ९६४**

# "महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकरांची उमेदवारी रद्द करा"

## » भाजपाची निवडणूक आयोगाकडे मागणी

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**कसबा आणि चिंचवड मतदारसंघात उद्या (२६ फेब्रुवारी) पोटनिवडणूक पार पडणार आहे. या दोन्ही मतदारसंघात शुक्रवारी प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून निवडणूक आयोगाची अचारसंहिता लागू करण्यात आली आहे. दरम्यान, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी भारतीय जनता पार्टीवर गंभीर आरोप केले आहे. प्रचाराची मुदत संपल्यानंतर भाजपाने पोलिसांना हाताशी घेऊन कसब्यात पैसे वाटप केले, असा आरोप धंगेकरांनी केला. याचा निषेध म्हणून रवींद्र धंगेकर यांनी कसबा गणपती मंदिरासमोर उपोषण सुरू केलं. यानंतर पोलिसांनी कारवाईचं आश्वासन दिल्यानंतर धंगेकरांनी उपोषण मागे घेतलं आहे.**

भाजपावर पैसे वाटल्याचा आरोप आणि रवींद्र धंगेकरांच्या उपोषणानंतर कसबा पोटनिवडणुकीने नवीन वळण घेतलं आहे. कसबा पोटनिवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांची उमेदवारी रद्द करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीने केली आहे. त्यामुळे निवडणूक आयोग यासंदर्भात काय निर्णय घेणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.रवींद्र धंगेकरांच्या आरोपांनंतर भारतीय जनता पक्षाचे नेते राजेश पांडे यांनी 'एबीपी माझा'शी संवाद साधला





आहे. रवींद्र धंगेकरांनी उपोषण करत निवडणूक आयोगाच्या अचारसंहितेचा भंग केला आहे. त्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द करण्यात यावी, अशी मागणी राजेश पांडे यांनी केली.

यावेळी राजेश पांडे म्हणाले, "मी दोन गोष्टी आपल्याला स्पष्टपणे सांगतो, रवींद्र धंगेकर यांनी अचारसंहितेचा भंग केला आहे. कुठलेही पुरावे नसताना त्यांनी आमच्यावर आरोप केले. पोलिसांवरही आरोप केले. त्यांनी निवडणूक आयोगाच्या अचारसंहितेचा भंग केल्यामुळे आम्ही त्यांच्याविरोधात तक्रार करणार आहोत. रवींद्र धंगेकरांची उमेदवारी रद्द करण्यात यावी, अशी तक्रार आम्ही निवडणूक आयोगाकडे करत आहोत. त्यांनी निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांचा भंग केला आहे."

"दुसरी बाब म्हणजे, महाविकास आघाडीने निवडणुकीमध्ये जातीयवाद आणण्याचा प्रयत्न केला. विकासाच्या मुद्द्यावर लढली जाणारी निवडणूक त्यांनी जातीय आणि धर्माच्या ध्रुवीकरणाकडे नेली. त्यांनी मुस्लिमांना असं आवाहन केलंय की, मतदानासाठी मेलेल्या लोकांना आणा, दुबईचे आणा आणि आखातीचेही आणा... या विधानामुळे कसब्यातील हिंदू जनतेच्या भावनेला ठेच पोहोचवली आहे. यामुळे या दोन्ही विषयाची तक्रार आम्ही आज निवडणूक आयोगाकडे करणार आहोत," अशी माहिती राजेश पांडे यांनी दिली.

### रवींद्र धंगेकर यांनी अचारसंहितेचा भंग केला

**»यावेळी राजेश पांडे म्हणाले, "मी दोन गोष्टी आपल्याला स्पष्टपणे सांगतो, रवींद्र धंगेकर यांनी अचारसंहितेचा भंग केला आहे. कुठलेही पुरावे नसताना त्यांनी आमच्यावर आरोप केले. पोलिसांवरही आरोप केले. त्यांनी निवडणूक आयोगाच्या अचारसंहितेचा भंग केल्यामुळे आम्ही त्यांच्याविरोधात तक्रार करणार आहोत. रवींद्र धंगेकरांची उमेदवारी रद्द करण्यात यावी, अशी तक्रार आम्ही निवडणूक आयोगाकडे करत आहोत. त्यांनी निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांचा भंग केला आहे."**

# पुणे-नाशिक महामार्ग मृत्यूचा सापळा!

## » वाहनचालक नागरिक हैराण : प्रशासनाकडून उपाययोजना करण्याची मागणी

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी परिसरातील पुणे-नाशिक महामार्गाची दुरवस्था हा वाहनचालकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न बनला असून, रस्ता दुभाजकातील बहुतांश रिफ्लेक्टर गायब झाल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी या रस्त्यावर वाहन चालवताना वाहनचालकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी रिफ्लेक्टर बसवण्यात आले होते. मात्र, रिफ्लेकृटर गायब किंवा तुटल्यामुळे रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांचा प्रखर प्रकाश थेट वाहनचालकांच्या डोळ्यांवर पडत असल्याने त्यांना पुढचा रस्ता दिसणे कठीण झाले आहे. यामुळे अनेक अपघात होऊन महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे.**



ज्या कंपनीने टोलवसुली करून हजारो कोटी रुपये वसूल केले, त्याच कंपनीने आयआरबी कंपनीकडून महामार्गाची डागडुजी केली जात असतानाही गेल्या दहा वर्षांत या महामार्गावर कोणतीही देखरेख किंवा किरकोळ काम झालेले नाही. अनेक ठिकाणी दुभाजक तुटले असून, या दुभाजकांवर वाहनचालक आजही वाहने चालवत असल्याने अपघात होत आहेत.

नाशिक फाटा ते चाकण हा औद्योगिक वसाहत हा महामार्ग विशेष धोकादायक बनला असून, जय गणेश एम्पायर चौक ते मोशी टोल प्लाझा या रस्त्यावर सर्वाधिक अपघात होत आहेत. वाढती रहदारी आणि भोसरी, चाकण आणि मोशी येथील औद्योगिक क्षेत्राचा झपाट्याने होणारा विकास यामुळे महामार्गावरील सुरक्षितता राखणे ही अत्यावश्यक जबाबदारी बनली आहे, कारण वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. वाहनचालक आणि पादचाऱ्यांनी चिंता व्यक्त करूनही प्रशासनाकडून कोणताही तोडगा निघाला नाही. गेल्या वर्षी पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे महामार्ग पाण्याखाली गेल्याने राजगुरुनगर ते भोसरीपर्यंतची वाहतूक दोन दिवस ठप्प झाली होती.

**१४ फेब्रुवारीला झाला होता अपघात...**

पुणे-नाशिक महामार्गावर खरपुडी फाटा येथे भीषण अपघाताची आहे. रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाने 17 महिलांना जोरात धडक दिल्याने यामध्ये 5 महिलांचा मृत्यू झाला होता. पुणे शहरातून खेड तालुक्यातील शिरोली येथील मंगल कार्यालयात स्वयंपाकासाठी रात्रीच्या सुमारास या महिला येत होत्या. त्याचवेळी महिंद्रा कंपनीच्या कारने या महिलांना रस्ता ओलांडताना धडक देन वाहन चालक रस्ता दुभाजक तोडून वाहनासह फरार झाला होता. नुकत्याच झालेल्या या अपघातामुळे या रस्त्याच्या धोकादायकपणाचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे.

### प्रशासनाचा हलगर्जीपणा?

» तथापि, प्रशासनाने केवळ तात्पुरत्या मलमपट्टीचे समाधान दिले आणि महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर चिंतेचा आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी हायवे डिव्हायडरवर रिफ्लेक्टर बसवणे महत्त्वाचे आहे, कारण ते रस्त्याच्या दुभाजकांसमोरील वाहनाचा प्रखर प्रकाश रोखते. रिफ्लेक्टर नसल्यामुळे सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढतो आहे. या प्रदेशातील औद्योगिक क्षेत्रे सतत विस्तारत आहेत आणि महामार्गावरील वाहतूक वाढत आहे. आयआरबी कंपनीने जबाबदारी घेऊन महामार्गावरील वाहनचालकांच्या सुरक्षिततेची खात्री करणे अत्यावश्यक आहे. पुढील अपघात टाळण्यासाठी आणि वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी प्रशासनाने कारवाई करून रस्ता दुभाजकावर त्वरित रिफ्लेक्टर बसवावेत.



# अस्वच्छ जागा बनली ‘सेल्फी पॉईंट’!

## » महापालिका प्रशासनाचा विधायक पुढाकार

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एखाद्या कल्पकतेने अस्वच्छ जागा ही कशी सुंदर आणि विलोभनीय दिसू शकते हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी दाखवून दिले आहे. पिंपळे सौदागरमधील काटेवस्ती येथे एका मोकळ्या जागेवर कचरा टाकला होता. मात्र आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कल्पकतेमुळे ती अस्वच्छ जागा आज चक्क सेल्फी पॉईंट झाली आहे.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका ‘ड’ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत क्षेत्रीय अधिकारी उमाकांत गायकवाड व सहाय्यक आरोग्य अधिकारी महेश आढाव, उपअभियंता स्थापत्य सुनील नरोटे, प्रभाग क्रमांक २८ पिंपळे सौदागरचे आरोग्य निरीक्षक प्रणय चव्हाण, रत्न सोनावणे, मिलिंद पोत्रे, बेसिक्स वॉर्ड इन्चार्ज सुखदेव लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली टीम बेसिक्सचे प्रतिनिधी स्वराज कांबळे, कुंडलिक कांबळे, धम्मपाल मोरे, अनिकेत खरात, अक्षय पाटील, दिनेश चिंचोके यांनी ही कामगिरी केली आहे.

स्वच्छतेच्या बाबत पहिला क्रमांकाचे शहर बनविण्याचा ध्यास घेतलेल्या पिंपरी चिंचवड महापालिकेच्या काही कल्पक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ज्या ठिकाणी लोक कचरा टाकायचे त्या जागेचा चेहरामोहराच बदलला आहे. आरोग्य विभागाच्या टीम ने त्या ठिकाणी सफाई करून कुंड्या व रांगोळ्या काढून ती जागा स्वच्छ ठेवली. त्या ठिकाणी अशा पद्धतीने कुंड्यांची रचना केली की एक सुंदर कलाकृती निर्माण झाली. त्याचप्रमाणे कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून त्यापासून शहराचे सौंदर्य वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

> टाकाऊ वस्तूंपैकी टायर फुटके माठ प्लास्टिकच्या बाटल्या यापासून तोफ बनवण्यात आली आहे. फुटलेल्या माठांना रंग-रंगोटी करून त्यात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली आहेत. रात्रीच्या वेळी या झाडांवर विद्युत रोषणाई केली आहे. जेणेकरून तेथे कधी कचरा टाकला जात होता याची कल्पनाच कोणाला येणार नाही. या उपयोजनामुळे गेल्या काही दिवसांपासून तेथे कचरा टाकने तर दूरच उलट लोक तिथे सेल्फी काढू लागले असून या सुंदर परिसराचा आनंद घेत आहेत.
> **- संजय पाटील, स्थानिक नागरिक.**



## संपादकीय »

### पाऊले चालती..

*जे सत्य खासगी गप्पांत, अनौपचारिक चर्चात वा कौटुंबिक कलकलाटात सहज समोर येते त्याचा शास्त्रशुद्ध, संख्याधारित तपशील 'द हिंदू' या वर्तमानपत्राने सादर केला आहे. तो वाचून चिंतित न होणारी व्यक्ती मूढमती म्हणवून घेण्यास सर्वार्थाने पात्र ठरेल.*

याचे कारण हा तपशील आहे गेल्या एका वर्षांत देशत्याग करणाऱ्यांचा. आधीच्या तपशिलानुसार २०१२ पासून परदेशी स्थलांतरित होऊ पाहणाऱ्या भारतीयांच्या संख्येत सातत्याने वाढ होताना दिसली. इतकी की या मुद्द्यावर आपण चीन आणि मेक्सिको यांसारख्या बारमाही स्थलांतरित देशांनाही सहज मागे टाकले. इतके दिवस आपल्या तरुणांना देशाबाहेर पाठवणाऱ्यांत चीन अव्वल होता. त्याआधी यासाठी मेक्सिकोचे नाव घेतले जायचे. तथापि आपला झपाटा इतका की आपण या दोन्ही देशांस मागे टाकले. गेल्या वर्षी युक्रेनवर रशियाने हल्ला केला त्यानंतर त्या एका देशात इतके भारतीय विद्यार्थी होते हे पाहून अनेकांस धक्का बसला. यातील बहुतांश वैद्यकीय शिक्षणासाठी त्या देशास जवळ केले होते. इतकेच काय पण यानिमित्ताने अगदी चीन, इंडोनेशिया, मलेशिया अशा तुलनेने लहान देशांतही किती भारतीय विद्यार्थी शिक्षणासाठी जातात याचा तपशील समोर आला. तो डोळे विस्फारायला लावणारा होता. ते झाले विद्यार्थ्यांचे. 'द हिंदू'चे वृत्त त्यापुढे जाऊन मातृभूमीचा कायमस्वरूपी त्याग करणाऱ्या गडगंज कमावत्या भारतीयांचा तपशील सादर करते. हे विद्यार्थी नाहीत. तर विद्यार्थिदशा संपवून उत्तम कमाई असणारे धनाढ्य भारतीय आहेत. म्हणून त्यांचा देशत्याग अधिक वेदनादायी.कारण २०२२ या एकाच वर्षात तब्बल अशा २.२५ लाख भारतीय धनाढ्यांनी देशत्याग करून परदेशास आपले म्हटल्याचे यातून दिसते. गेल्या ११ वर्षांतील ही सर्वाधिक संख्या. एकाच वर्षात इतक्या साऱ्या भारतीयांनी देशास 'अखेरचा हा तुला दंडवत..' असे म्हणणे पुरेसे धक्कादायक आहे. या वेदनांस आणखी एक करुण किनार आहे. ती अशी की या देशत्यागी भारतीयांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा कोणत्याही कारणांसाठी देशाकडे पाठ केली असे झालेले नाही. त्यांचे भारतात उत्तम चाललेले होते आणि या सर्वांची गणना 'हाय नेट इंडिव्हिज्युअल्स' (एचएनआय) या गटात होत होती. किमान आठ-सव्वाआठ कोटी रुपयांची मालमत्ता नावावर असल्याखेरीज या गटात प्रवेश नसतो. म्हणजे हे इतके सारे भारतीय शब्दश: असे कोट्यधीश आहेत.

# दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्ट्याची पायाभरणी..






राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, हरियाणा, दिल्ली, उत्तरप्रदेश असा औद्योगिक पट्टा विकसित करण्याच्या 'दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर'मध्ये १० हजार हेक्टर जमीन संपादन करायची होती. जमीन द्यायला कोणी तयार नव्हते. 'आम्हाला जमीन विकायचीच नाही, असा पहिला पवित्रा'. अधिकारी जायचे, काय भाव दिला तर जमीन द्याल, असा प्रश्न विचारायचे. पण, कोणी तयार व्हायचे नाही. मग, प्रशासनाच्या विरोधात मोर्चे निघाले. तेव्हा औरंगाबादच्या जिल्हाधिकारीपदी कुणालकुमार हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी होते. मोर्चातील नेते आणि जमीन मालक यांची विभागणी, त्यातील गरजवंत शेतकऱ्यांचा शोधाशोध. मग, जमिनीचा दर ठरविण्यासाठी घासाघीस.

मग रेडीरेकनर सरासरीपेक्षा कितीपट अधिकचा दर देत आहोत याची गणिते मांडून पुन्हा चर्चा, असा क्रम त्यांनी सुरू ठेवला. पुढे विक्रम कुमार, नवलकिशोर राम यांनी आंदोलनातील बोलघेवड्या नेत्यांना खड्यासारखे बाजूला करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला आणि आठ हजार एकर जमीन मिळवली. त्यातील दोन हजार एकरावर शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये सर्व सुविधा उपलब्ध आहेत. अगदी सहा दशलक्ष घनमीटर सामायिक जलशुद्धीकरण प्रकल्पापासून ते पाण्याच्या पुनर्वापराचे नियोजन.

एक पूर्ण शहर वसविण्यासाठी भूखंड घेण्यात आले. त्यांचे दर ठरविण्यात आले आणि आता 'ह्युसंग'सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांसह १२५ भूखंडांवर सुमारे पाच हजार कोटींची औद्योगिक गुंतवणूक झाली. Vआता औद्योगिक शहरातील उत्पादने थेट जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट बंदरापर्यंत पोहोचविण्यासाठी शुष्क पोर्टही जालना येथे उभे राहत आहे. मालवाहतुकीचा समृद्धी महामार्गाही दिमतीला असल्याने आता वेग वाढतो आहे. परिणामी, शेंद्रा ते बिडकीन या भागातील रस्त्यालगतच्या जमिनीचा एकरी भाव दोन कोटींपर्यंत वधारला आहे. बँकांमध्ये अनामत रकमेची गंगाजळीही वाढत आहे.

## अभिजात मराठी एक पुरावा... दोन जाळावे!

**आम्ही गा मराठी । मोठे बोलभांड। करु हेळसांड। एकजुटी।।एका अतिशय पुरातन आणि गहन विषयाला आम्ही हात घालत आहो. वाचकांचा आशीर्वाद हीच आमची पुंजी आहे. त्या पूर्वसंचिताच्या जोरावरच आम्ही हे भाषिक संशोधनाचे शिवधनुष्य (आणि बाणही) पेलले आहे. विषय जिव्हाळ्याचा, आपुलकीचा आणि क्लोज टु द हार्ट अशा प्रकारचा आहे.**

आपली जी काहीएक मराठी नावाची भाषा आहे किंवा होती, तिच्या भूतकाळातील पुराव्यांचा धांडोळा घेऊन आपण वर्तमानातील तिचे स्थान आणि भविष्यातील होष्माण यांचे साक्षेपी विवेचन येथे करणार आहो. माय मराठीला अभिजात करुया, हे आवाहन करितो, आणि लेखन प्रपंच आटपिते. माय मराठी नमस्तुते.

विषय गहन आणि पुरातन आहे, हा डिस्क्लेमर आम्ही आधीच देऊन ठेविला आहे. याऊप्पर पुढील मजकूर वाचकांनी स्वत:च्या जबाबदारीवर वाचावा, असा सल्लादेखील आम्ही देऊन ठेवितो. कां की, या मजकुरामुळे कुणाच्या भावना दुखावू शकतात, कुणाचे हृदय दुखावू शकते किंवा अन्य कुठलाही अवयव दुखण्यास आमंत्रण मिळू शकते. तेव्हा होशियार!

आपण ज्याला महाराष्ट्र असे सर्वसाधारणपणे म्हणतो, तेथे एकेकाळी मराठी ही एकमेव भाषा बोलली जात



होती, असे पुरावे इतिहासात आढळत नाहीत; तरीही सर्वसाधारणपणे ही भाषा पाचेक हजार वर्षे तरी जुनी असावी, असे मानण्यास (बरीच ऐसपैस) जागा आहे. महाराष्ट्रात पूर्वी दंडकारण्य होते.

म्हणजे जंगल. जंगलात वन्यजीव राहात. ते कुठलीच भाषा बोलत नसत, हे उघड आहे. काही आदिमानव गुहेतबिहेत राहात असतील. ते जी भाषा बोलत, तीस मराठी म्हणत, असे काही ठामपणे सांगता येणे शक्य नाही; तरीही काही जणांच्या मते मराठी ही भाषा पाचेक हजार वर्षे नसली तरी चार-साडेचार हजार वर्षे तरी जुनी असणारच.काहींच्या मते ही भाषा अगदीच नवीन असून बऱ्याच मराठी लोकांनाही ती तोडकीमोडकीच येते. याचे पुरावे आपल्याला हल्ली पुण्यासारख्या शहरगावातही दिसू लागले आहेत. काहींच्या मते तर मराठी नावाची अशी कुठली भाषाच अस्तित्वात नसून शुद्ध मराठी भाषा ही एक शुद्ध अफवा आहे.

पुराव्यादाखल ही मंडळी मध्यमवर्गीय अंकल-आंटी यांची टावरमधली घरे, विविध टीव्ही च्यानले आणि सोशल मीडियात वापरल्या जाणाऱ्या मराठी भाषेकडे अंगुलीनिर्देश करतात. मराठीच्या न-अस्तित्वाचा हा पुरावा इतका तगडा आणि रग्गड आहे की कुणालाही मराठी भाषा ही अफवाच वाटावी.असे असले तरी, मराठी ही भाषा नसून फक्त मायबोली आहे, हे अनुमानदेखील पटण्याजोगे आहे. (पहा, वाचा अथवा म्हणा : मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे!) मायबोलीचा ढोबळ अर्थ आई, मम्मा, ग्रॅनी आदींशी घरी बोलावयाची भाषा.तिचा कार्यालयात अथवा सामाजिक वावरात उपयोग करणे अपमानास्पद मानले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पैसे वाटणे: काँग्रेस-राष्ट्रवादीची संस्कृती!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रत्यूत्तर; पुणे- कसबा पोटनिवडणुकीत अटीतटीचा सामना

। पुणे । महाईन्यूज ।

**पुण्यातील कसबा प्रचारादरम्यान भाजपाने पोलिसांसोबत मिळून कसब्यात पैसे वाटल्याचा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी केला आहे. या विरोधात आज(शनिवार) ते सकाळी १० वाजता कसबा गणपती मंदीरासमोर सपत्नीक उपोषणाला बसले आहेत. धंगेकरांच्या आरोपांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिलं आहे.**

प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले, "राजकीय स्टंट आहे. सरळ हे स्पष्टपणे लक्षात येत आहे की आज कुठल्याही प्रकारचा प्रचार करता येत नाही. हे माहीत असताना, अशाप्रकारचा स्टंट करून एक नवीन प्रकारे प्रचार करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पायाखालून जेव्हा वाळू निघून जाते, त्यावेळी असे स्टंट केले जातात."



याचबरोबर "खरं म्हणजे हे आचारसंहितेचं पूर्ण उल्लंघन आहे. पैसे वाटणे ही संस्कृती काँग्रेस, राष्ट्रवाची आहे. भाजपाची नाही आणि आमचा मतदारही असा नाही की पैसे घेऊन कुठे मतदान करेल. खरं म्हणजे एकप्रकारे मतदारांचा अवमान करण्याचं हे काम आहे. हे उपोषण भाजपाच्या विरोधात नाही, हे मतदारांच्या विरोधात आहे कारण तुम्ही मतदारांना विकावू ठरवत आहात, हे अतिशय चुकीचं आहे. ईश्वर त्यांना सुबुद्धी देवो." असंही फडणवीसांनी म्हटलं आहे.


कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून प्रशासनाने १३ हजार ५४२ वाहनांची तपासणी केली आहे. नाके तपासणी व भरारी पथकांच्या तपासणीत एकूण पाच घटनांमध्ये २८ लाख १८ हजार ५०० रुपयांची रक्कम ताब्यात घेण्यात आली असीम, ही रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात आली आहे निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कसबा पेठ विधानसभा पोट निवडणूकीच्या प्रचार शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता संपला.

# नामांतराला आम्ही विरोध करतच राहणार : खासदार इम्तियाज जलिल यांची भूमिका

## लोकांना भावनिक मुद्यांत अडकवण्याचा भाजपाचा प्रयत्न

। मुंबई । महाईन्यूज ।

**केंद्र सरकारने औरंगाबाद शहराचं नामांतर छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचं धाराशिव करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयानंतर राज्यात श्रेयवादाची लढाई रंगली आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी संपूर्ण औरंगाबाद जिल्ह्याचं नाव बदलणार की फक्त औरंगाबाद शहराचं नाव छत्रपती संभाजी नगर होणार? असा प्रश्न उपस्थित केला आहे. दानवे**



**यांच्या या प्रश्नानंतरही वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत.**

दरम्यान, औरंगाबाद जिल्ह्याचे खासदार तथा एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. मी औरंगाबाद शहराच्या नामांतराला याआधीही विरोध केला होता. भविष्यातही आम्ही याला विरोधच करणार, असे जलिल म्हणाले.

"नामांतराला आमचा सुरुवातीपासूनच विरोध आहे. आमचा विरोध फक्त नामांतराला आहे. आमचा छत्रपती संभाजी महाराज यांना विरोध नाही. भविष्यताही त्यांच्या नावाला विरोध करणार नाही. आम्ही छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांचाच आदर करतो. मात्र या महापुरुषांचे नाव घेऊन आम्ही कधीही राजकारण केलेले नाही. ते राजकीय स्वार्थासासाठी महापुरुषांच्या नावाचा वापर करत आलेले आहेत. आम्ही नावाचा विरोध केला, भविष्यातही विरोध करत राहणार. कारण सरकारकडे लोकांना दाखवण्यासाठी काहीही नाही. त्यामुळे अशा प्रकारचे मुद्दे ते पुढे आणतात. लोकांना भावनिक मुद्द्यांमध्ये कसे अडकवायचे, हे त्याचेच एक उदाहरण आहे," अशी भूमिका जलील यांनी मांडली.

# जगभरात टंचाई, महाराष्ट्रात रस्त्यावर फेकण्याची वेळ!

। नाशिक महाईन्यूज ।



**बांगलादेश आणि श्रीलंकेत थांबलेली निर्यात, देशात इतरत्र झालेले उत्पादन यामुळे नाशिकसह महाराष्ट्रातील लाल कांद्याच्या मागणीत लक्षणीय घट होऊन कांद्याचे दर ५०० रुपये क्विंटलवर घसरले आहेत. दर गडगडल्याने कांदा बाजारात विकण्याऐवजी रस्त्यावर फेकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असताना जगभरातील अनेक देशांत कांदा टंचाई आणि महागाईने तेथील जनतेच्या डोळ्यांत पाणी आणले आहे. फिलिपिन्स, तुर्कस्थान, मोरोक्को, उझबेकिस्तान तसेच युरोपातील अनेक देशांत सध्या कांद्याच्या दरांत लक्षणीय वाढ झाली आहे.**

महाराष्ट्रात कांद्याचे दर चार वर्षांतील निचांकी पातळीवर आहेत. गेली तीन वर्षे कांद्याला प्रति क्विंटल सरासरी दोन हजार रुपयांचा दर मिळाला होता. या वर्षाच्या सुरुवातीला, जानेवारीत लासलगाव बाजारात ११ लाख ६२ हजार क्विंटल लाल कांद्याची आवक झाली. त्यावेळी कांद्याला सरासरी १३९२ रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला. चालू महिन्यात आवक त्याच प्रमाणात असली तरी, दर मात्र ८०० रुपयांनी घसरले आहेत. घाऊक बाजारात कांद्याची मुबलक आवक होत असताना मागणी नसल्यामुळे दरात लक्षणीय घसरण झाल्याचे विश्लेषक सांगतात. याला निर्यातीत झालेली घट जबाबदार असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे.

महाराष्ट्रातील विशेषत: नाशिकमधील कांद्याला श्रीलंका आणि बांगलादेश येथून अधिक मागणी आहे. मात्र, बांगलादेशने स्थानिक कांद्याच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी आयातीवर बंदी आणली आहे. देशांतर्गत उत्पादित कांदा संपुष्टात येईपर्यंत बांगलादेश भारतीय कांद्याला परवानगी देणार नाही, असा अंदाज लासलगाव बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे यांनी व्यक्त केला.

### फिलिपिन्समध्ये तीन हजार रु. किलो!

**पाकिस्तानातील महापूर, युक्रेन-रशिया युद्ध, मध्य आशियातील हवामान संकट आदी कारणांमुळे जगभरात कांद्याची टंचाई आणि महागाई भेडसावू लागली आहे. फिलिपिन्स या देशात तर कांदा मटणाहूनही महाग झाला आहे. तेथे सध्या प्रति किलो कांद्याला ७०० पेसो (३५१२ रुपये) इतका भाव आहे. हे दर नियमित दराच्या दहापट अधिक आहेत.**

# सातारा येथे स्कूल बसला भीषण आग

## सुदैवाने जीवितहानी नाही

। सातारा । महाईन्यूज ।

**सातार्‍यातील वाठार कॉलनी ( ता खंडाळा) येथे शाळेतल्या मुलांना घेऊन जाणाऱ्या स्कूल व्हॅनने अचानक पेट घेतला आहे. बस शालेय मुलांना घेऊन जात असतानाच ही घटना घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र बस पूर्ण जळून खाक झाले**

खंडाळा तालुक्यातील शेडगेवाडी येथून वाठार कॉलनी येथे शाळेतील मुलांना ही बस घेऊन जात असताना ही घटना घडली. गाडीतून धूर येत असल्याचे लक्षात येतात चालकाने समय सूचकता दाखवत गाडी थांबवून सर्व मुलांना



गाडीपासून लांब नेल्याने मोठा अनर्थ टळला आहे. घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र बसचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेची नोंद पोलिसात झाली आहे

# सोनिया गांधी राजकारणातून निवृत्ती घेण्याच्या तयारीत?

## अधिवेशनात केले सूचक विधान; म्हणाल्या "माझ्या प्रवासाचा समारोप..."

। रायपूर । महाईन्यूज ।

**छत्तीसगडमधील रायपूर येथे काँग्रेसचे ८५ वे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले. या अधिवेशनात काँग्रेसचे जवळपास १५०० प्रतिनिधी उपस्थित होते. या अधिवेशनात काँग्रेसचे विद्यमान अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. तसेच काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनीदेखील आपले विचार मांडले. आपल्या भाषणादरम्यान सोनिया गांधी यांनी राजकीय संन्यास घेणार असल्याचे संकेत दिले आहेत.**

माझ्या प्रवासाचा समारोप काँग्रेससाठी टर्निंग पॉईंट ठरलेल्या 'भारत जोडो यात्रे'ने झाला, याचे मला जास्त समाधान आह, असे सोनिया गांधी म्हणाल्या आहेत. सोनिया गांधींच्या या विधानामुळे वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे.

सोनिया गांधी यांनी आपल्या भाषणात मोदी सरकारवर सडकून टीका केली. "भारत देश तसेच काँग्रेससाठी हा आव्हानात्मक काळ आहे. भाजपा, आरएसएसने देशातील प्रत्येक संस्था ताब्यात घेतली आहे. तसेच या संस्था नेस्तनाबूत केल्या आहेत. काही उद्योगपतींच्या हिताचे निर्णय घेऊन मोदी सरकारने भारतीय



अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे," अशी टीका सोनिया गांधी यांनी केली.

**माझ्या प्रवासाचा समारोप...**

सोनिया गांधी यांनी राजकीय संन्यास घेणार असल्याचेही यावेळी संकेत दिले. "डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली २००४ आणि २००९ साली लोकसभा निवडणुकीत आपला विजय झाला. यामुळे मी वैयक्तिकरित्या समाधानी आहे. मात्र माझ्या प्रवासाचा समारोप काँग्रेससाठी टर्निंग पॉईंट ठरलेल्या 'भारत जोडो यात्रे'ने झाला, याचे मला जास्त समाधान आहे," असेही सोनिया गांधी म्हणाल्या.

**कमी होत गेलेला वावर**

गेल्या वर्ष-दीड वर्षांपासून सोनिया गांधींचा सार्वजनिक जीवनातील वावर कमी होत गेला आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर राहुल गांधींनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर पक्ष सांभाळण्यासाठी सोनिया गांधींनी हंगामी पक्षाध्यक्ष म्हणून पक्षाची सूत्रे हाती घेतली होती. मात्र, पक्षाचा खरा कारभार राहुल गांधी हेच चालवताना दिसत होते. पक्षातील महत्त्वाचे निर्णय सोनियांशी चर्चा करून घेतले जात असले तरी, या निर्णयप्रक्रियेमध्ये राहुल यांचा 'हस्तक्षेप' होता. त्यामुळे पक्षात असंतोष वाढत गेला आणि बंडखोर 'जी-२३' गटाने राहुल गांधींच्या नेतृत्वाला विरोध केला. या संघर्षामध्ये सोनिया गांधींनी मध्यस्थी करून वाट काढण्याचा प्रयत्न केला होता.

बंडखोर गटातील नेत्यांशी झालेल्या पाच तासांच्या बैठकीनंतर पक्षाध्यक्ष पदाची निवडणूक घेण्याचा महत्त्वाचा निर्णय सोनिया गांधी यांनी घेतला. त्यांच्या आदेशानुसार पक्षाध्यक्ष पदाची निवडणूक होऊन २० वर्षांनंतर पहिल्यांदाच गांधीतर व्यक्ती, मल्लिकार्जुन खरगे पक्षाध्यक्ष झाले.

### भाजपा-संघाविरोधात संघर्ष करा!

**केंद्रातील मोदी सरकार आणि भाजपा-संघ यांनी देशातील प्रत्येक संस्थेचे स्वातंत्र्य नष्ट केले आहे. विरोधी आवाज निर्दयपणे बंद केला गेला आहे. देशाच्या अर्थकारणाची दुरवस्था झाली आहे. दलित, आदिवासी, अल्पसंख्य, महिलांवर सातत्याने अत्याचार होत आहेत. अवघा देश द्वेषाच्या आगीमध्ये गुदमरू लागला आहे, लोक घाबरून जगत आहेत. देशातील आव्हानात्मक स्थितीविरोधात काँग्रेसने लढले पाहिजे. काँग्रेस हा फक्त राजकीय पक्ष नव्हे तर खुल्या वातावरणामध्ये समानता आणि आर्थिक संपन्नता निर्माण करण्याचे साधन आहे, असे सोनिया गांधी म्हणाल्या. भाजपा-संघाविरोधात लढण्यासाठी धडाडीने पुढे जा, लोकांना भेटा, त्यांच्याशी संवाद साधा, तरच काँग्रेसला यश येईल, अशी सूचना सोनिया गांधींनी केली.**

---

# "डोनाल्ड ट्रम्प यांना ठार करण्याची आमची इच्छा आहे"

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावपूर्ण संबंध जगजाहीर आहेत. याच दरम्यान इराणने १ हजार ६५० किलोमीटर रेंजच्या एका क्रुज मिसाइलची निर्मिती केली आहे. युक्रेन युद्धात रशियाकडून इराणच्या ड्रोनचा वापर करण्यात आल्यानंतर हे क्षेपणास्त्र पश्चिमी देशांची चिंता आणखी वाढवू शकतं. एवढच नाहीतर रिव्होल्युशनरी गार्ड्स एरोस्पेस फोर्सचे प्रमुख अमीराली हाजीजादेह यांनीही अमेरिकेला प्रमुख कमांडरच्या हत्येचा बदला घेण्याची धमकी दिली आहे.

हाजीजादेहने म्हटले आहे की, आम्ही डोनाल्ड ट्रम्प यांना मारू करू इच्छितो. शासकीय टीव्हीवर बोलताना त्यांनी सांगितले की, १ हजार ६५० किमी रेंजच्या नव्या क्रूज मिसाइलला इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या मिसाइल शस्त्रागारात समाविष्ट करण्यात आलं आहे. याशिवाय पहिल्यांदाच या मिसाइलचे फुटेजही दाखवलं



गेलं. मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये इराणच्या कमांडरने दावा केला होती की, देशाने हायपरसोनिक बॅलेस्टिक मिसाइल विकसत केले आहे.

हाजीजादेह यांनी म्हटले की बगदादमध्ये २०२० मध्ये अमेरिकेच्या ड्रोन हल्ल्यात इराणी सैन्य कमांडर कासिम सुलेमानींचा मृत्यू झाल्याच्या काही दिवसानंतर जेव्हा इराणने अमेरिकन नेतृत्वातील सैन्यावर बॅलेस्टिक मिसाइलहल्ला केला. तेव्हा त्यांचा हेतू बिचाऱ्या सैनिकांना मारण्याचा नव्हता. अल्लाहची इच्छा असेल तर आम्ही ट्रम्पला मारू इच्छितो. माइक पॉम्पिओ(अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री) आणि सुलेमानी यांच्या हत्येचा आदेश देणाऱ्या सैन्य कमांडर्सना मारलं पाहिजे.

# रशियाने माघार घ्यावी!

## युक्रेनमधील युद्ध : संयुक्त राष्ट्रांचा ठराव; युक्रेनमधील पेचावर भारतासह 32 देश तटस्थ

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**क्रेनमधील युद्ध संपवून रशियाने आपले सैन्य मागे घ्यावे, अशी मागणी करणारा गैरबंधनकारक ठराव संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने मंजूर केला. भारताने मात्र तटस्थ राहून या ठरावावर मतदान केले नाही. या ठरावाद्वारे युक्रेनमध्ये व्यापक, न्याय्य व चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्याची गरज अधोरेखित केली गेली.**

या ठरावावर संयुक्त राष्ट्र आमसभेच्या १९३ सदस्य राष्ट्रांपैकी ३२ देशांनी मतदान केले नाही. त्यात भारतही होता. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत 'युक्रेनमध्ये व्यापक, न्यायसंगत व कायमस्वरुपी शांतता प्रस्थापनेसाठी संयुक्त राष्ट्रांची सनद (चार्टर) सिद्धांत' ठराव मंजूर करण्यात आला. या प्रस्तावाच्या



### भारत वर्षभर ठरावांपासून अलिप्तच!

**संयुक्त राष्ट्र आमसभेचे ठराव हे प्रतिकात्मक असतात. सुरक्षा परिषदेतील ठरावांप्रमाणे बंधनकारक नसतात. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यापासून, संयुक्त राष्ट्रसंघ आमसभा, सुरक्षा परिषद आणि मानवाधिकार परिषदेतील अनेक ठरावांद्वारे या आक्रमणाचा निषेध करण्यात आला आहे. तसेच युक्रेनचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य, एकात्मता व आणि प्रादेशिक अखंडतेसाठी वचनबद्धता याद्वारे अधोरेखित केली आहे. युक्रेनवरील रशियन आक्रमणानंतर गेल्या वर्षभरात आपत्कालीन विशेष सत्रांतर्गत महासभेची सहा वेळा बैठक झाली आहे. भारताचे रशियाशी चांगले संबंध असून, युक्रेनवरील संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांपासून भारत आतापर्यंत अलिप्त राहिला आहे.**

बाजूने १४१ मते पडली, तर सात मते विरोधात पडली. या युद्धाच्या एक वर्षांनंतरही युक्रेन व रशिया या दोघांनाही मान्य असलेला तोडगा शोधण्यास जगाला यश आले आहे का, असा सवाल मात्र भारताने उपस्थित केला.

हा ठराव मंजूर झाल्यानंतर भारताच्या बाजूने स्पष्टीकरण देताना, संयुक्त राष्ट्रांतील भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंबोज म्हणाल्या, की युक्रेन संघर्षाला एक वर्ष पूर्ण झाल्यामुळे आमसभेने स्वत:ला काही प्रश्न विचारणे महत्वाचे आहे. आम्ही युक्रेन व रशिया या दोघांनाही मान्य असलेल्या संभाव्य तोडग्यापर्यंत पोहोचलो आहोत का? रशिया व युक्रेन या दोन्ही बाजूंचा सहभाग नसलेली कोणत्याही प्रक्रियेतून आपल्याला विश्वासार्ह व सार्थ तोडगा मिळू शकणार आहे का? जागतिक शांतता आणि सुरक्षेच्या समकालीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची यंत्रणा आणि विशेषत: संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद कुचकामी ठरली नाही का? युक्रेनमधील परिस्थितीबद्दल भारताला अतीव चिंता वाटते.

# अखेर शैलेश लोढांनी 'तारक मेहता' सोडण्याचं सांगितलं खरं कारण..



'तारक मेहता का उल्टा चष्मा' या मालिकेमुळे घराघरात प्रसिद्ध झालेले शैलेश लोढा यांनी लखनौमध्ये आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात सहभाग घेतला होता. या साहित्य संमेलनात शैलेश लोढा यांनी खूप सुंदर कवितांच्या रचना ऐकवल्या. त्यांनी आपले वडील श्याम सिंग लोढा यांच्याविषयी देखील बातचीत केली. आणि एका महत्त्वाच्या प्रश्नाचे देखील उत्तर दिले. शैलेश लोढा यांनी आपल्या वडीलांप्रती बोलताना मजेशीर अंदाजात ते म्हणाले की," माझ्या वडीलांवरती काही खास लिहिलं आहे...जे मी तुम्हाला ऐकवीन पण मग हा शो माझ्या वडीलांना दाखवू नका..कारण घराचे पेपर्स आजही त्यांच्याच नावावर आहेत". शैलेश लोढा म्हणाले-"माझ्या वडीलांच्या दोन्ही किडनी खराब झाल्या आहेत. ते डायलिसिसवर आहेत. पण तरीही देखील ते खूप फनी आहेत. मी त्यांच्याकडे एकदा किडनी ट्रान्सप्लान्ट विषयी बोललो होतो".' म्हटलं एवढे पैसे दिले तर नवीन किडनी लावता येईल. तर ते मला म्हणाले,मग डॉक्टरला विचार जुन्या किडनीचे किती देणार?'मग शैलेश लोढा यांना एक महत्त्वाचा प्रश्न विचारला गेला. जो गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. 'तारक मेहता का उल्टा चष्मा' मालिका त्यांनी का सोडली असं शैलेश लोढा यांना विचारला गेला.तेव्हा शैलेश लोढा म्हणाले-"जे सोडलं त्याविषयी काय बोलायचं? तसा हा राष्ट्रीय प्रश्न आहे. तुम्ही मी जे बोलतो त्याचा इशाऱ्यांमध्ये समजलं तर बरं होईल. ज्या देशात पब्लिशर जे दुसऱ्याचं पुस्तक छापतात ते हिऱ्याची अंगठी घालून फिरतात आणि लेखकाला स्वतःला आपलं पुस्तक छापण्यासाठी पैसे द्यावे लागतात".'

# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या सेटवर अशी वागते सई ताम्हणकर, प्राजक्ता माळी

'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या सेटवर अशी वागते सई ताम्हणकर, प्राजक्ता माळीचा खुलासा, म्हणाली, "ती कोणाशीही " 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमाच्या सेटवर सई ताम्हणकर कशी वागते? प्राजक्ता माळीने केलेलं वक्तव्य चर्चेत 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमाच्या सेटवर सई ताम्हणकर कशी वागते? प्राजक्ता माळीने केलेलं वक्तव्य चर्चेतमराठीमधील टॉपच्या अभिनेत्रींमध्ये सई ताम्हणकर अगदी पुढे आहे. सईने आजवर रुपेरी पडद्यावर उत्तमोत्तम भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. ती फक्त मराठी चित्रपटसृष्टीपर्यंतच मर्यादित राहिली नाही. तर तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण करत तिथे आपलं एक वेगळं स्थान निर्माण केलं. चित्रपटांमध्ये काम करत 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमाच्या परीक्षकाच्या खुर्चीत सईने स्थान मिळवलं. या कार्यक्रमामधील कलाकारांना शाबासकीची थापही देते.





# सान्या मल्होत्राची 'दंगल'ची कहानी



**मायानगरीत प्रवेश करणे सोपे नाही. इथे प्रत्येक पायरीवर संघर्ष असतो आणि जो संघर्ष करून पुढे जातो तोच यशस्वी होतो. असाच किस्सा सान्या मल्होत्राचा आहे, जी तिचा 31 वा वाढदिवस साजरा करण्याच्या तयारीत आहे.**

25 फेब्रुवारी 1992 रोजी जन्मल्यानंतर, दिल्लीच्या रस्त्यांवर वाढलेल्या सान्याचे आयुष्य सोपे नव्हते. तिने दिल्लीतूनच ग्रॅज्युएशन केले आणि अभिनेत्री बनण्याचे तिचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती मुंबईत आली. मायानगरीत सान्याला खूप संघर्ष करावा लागला. सगळ्या धडपडीनंतर तिला काही काम मिळू लागले. सान्या आमिर खानच्या दंगल या चित्रपटात बबिता फोगटच्या भूमिकेत प्रकाशझोतात आली, पण हा चित्रपट तिला इतक्या सहजासहजी मिळाला नाही. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की सुमारे 10,000 मुलींनी दंगलसाठी ऑडिशन दिले, ज्यामध्ये सान्या जिंकली. दंगलमध्ये आमिर खानसोबत काम केल्यानंतर सान्याने त्याच्या प्रोडक्शन हाऊसमध्ये इंटर्न म्हणूनही काम केले. इथे ती पोस्ट-प्रॉडक्शन, प्री-प्रॉडक्शन वगैरे शिकली.सान्या मल्होत्राने आमिर खानच्या सिक्रेट सुपरस्टार चित्रपटातही काम केले होते. या चित्रपटात ती कोरिओग्राफर म्हणून जोडली गेली होती. सान्याने आतापर्यंत लुडो आणि बधाई हो यांसारख्या चित्रपटांतून तिच्या अभिनयाची चुणूक दाखवली आहे.

# 'माधुरीनंतर तूच रे तूच खरा डान्सर..'



अभिषेक बच्चन सोशल मीडियावर भलताच सक्रिय पहायला मिळतो. मग ट्रोलर्सवर पलटवार करणं असो की चाहत्यांशी संवाद साधणं असो..त्याच्या ट्वीटमध्ये कमालीचा ह्युमर पहायला मिळतो. असाच ह्युमर पुन्हा एकदा पहायला मिळाला जेव्हा रणबीरच्या एका चाहत्यानं अभिषेकला तो माधुरी दिक्षितनंतर बेस्ट डान्सर आहे असं म्हटलं.

त्या नेटकऱ्याला त्यानंतर इतर नेटकऱ्यांनी ट्रोल करायला सुरुवात केली. अनेक जणांनी इंडस्ट्रीतल्या काही इतर कलाकारांचा उल्लेख केला जे डान्समध्ये माहिर आहेत. यामध्ये गोविंदा,हृतिक रोशन आणि टायगर श्रॉफ सारखे ॲक्टर्स आहेत. अर्थात अभिषेकनं नेटकऱ्याला मजेदार अंदाजात उत्तर दिलं ज्यानंतर त्याचे ते ट्वीट जोरदार व्हायरल झाले.

# जेम्स अँडरसनने रचला मोठा विक्रम!

## श्रीलंकेचा माजी फिरकीपटू मुथय्या मुरलीधरनला मागे टाकत केला ‘हा’ कारनामा

।वेलिंग्टन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**वेलिंग्टन येथे इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात दुसरा कसोटी सामना खेळला जात आहे. इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनने सामन्याच्या दुसऱ्या दिवशी एक मोठा विक्रम केला.**



इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन सध्या कारकिर्दीच्या अशा टप्प्यावर आहे, जिथे प्रत्येक सामन्यात तो एकतर मोठा पराक्रम करत आहे किंवा विक्रम मोडत आहे. ४० वर्षीय अँडरसनने आता गुरुवारी आणखी एक टप्पा गाठला आहे. कसोटीतील दुसऱ्या डावात सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने या बाबतीत श्रीलंकेचा माजी दिग्गज फिरकीपटू मुरलीधरनचा विक्रम मोडला आहे.

अँडरसनने इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात वेलिंग्टनच्या बेसिन रिझर्व्ह मैदानावर हा पराक्रम केला. त्याने सामन्याच्या दुसऱ्या दिवशी तीन गडी बाद केले. अँडरसनने आपल्या कसोटी कारकिर्दीत आतापर्यंत दुसऱ्या डावात २३१ विकेट्स घेतल्या आहेत. त्याचवेळी मुरलीधरनने दुसऱ्या डावात २२८ विकेट घेतल्या आहेत. वेलिंग्टन कसोटीबद्दल बोलायचे तर, शनिवारी इंग्लंडने पहिला डाव ४३५/८ धावांवर घोषित केला. जो रूटने नाबाद १५३ आणि हॅरी ब्रूकने १८६ धावांचे योगदान दिले. न्यूझीलंडकडून मॅट हेन्रीने चार विकेट घेतल्या. न्यूझीलंडचा संघ मोठ्या धावसंख्येसमोर फलंदाजीसाठी उतरला तेव्हा त्याची सुरुवात चांगली झाली नाही. अँडरसनने पहिल्याच षटकात डेव्हॉन कॉनवेला (०) पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

त्याने केन विल्यमसन (४) आणि विल यंग (२) यांना आपल्या जाळ्यात अडकवले. त्याच्याशिवाय जॅक लीचने तीन आणि स्टुअर्ट ब्रॉडने एक बळी घेतला.

पावसामुळे दुसऱ्या दिवसाचा खेळ लवकर संपला. तोपर्यंत ४२ षटकांत न्यूझीलंडची धावसंख्या १३८/७ अशी होती. टॉम ब्लंडेल (२५) आणि कर्णधार टिम साऊदी (२३) नाबाद आहे.

### पहिल्या आणि तिसऱ्या डावात सर्वाधिक विकेट

**पहिल्या आणि तिसऱ्या डावात सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम अजूनही मुरलीधरनच्या नावावर आहे. मुरलीधरनने पहिल्या डावात २३० आणि तिसऱ्या डावात २३६ विकेट्स घेतल्या आहेत. ऑस्ट्रेलियाचा महान फिरकी गोलंदाज शेन वॉर्नने चौथ्या डावात सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. त्याने १३८ विकेट्स आपल्या नावावर केल्या आहेत. विशेष म्हणजे मुरलीधरनने (८००) कसोटीत सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. त्याच्या खालोखाल वॉर्न (७०८) तर अँडरसन (६८५) तिसऱ्या स्थानावर आहे.**

# दक्षिण आफ्रिकेचा इंग्लंडला धक्का

## प्रथमच महिला ट्वेन्टी-20 विश्वचषकाच्या अंतिम फेरीत

। केपटाउन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**तझमिन ब्रिट्स (५५ चेंडूंत ६८ धावा) आणि लॉरा वोल्व्हार्ड (४४ चेंडूंत ५३) या सलामीवीरांची अप्रतिम फलंदाजी, तसेच अयाबोंगा खाका (४/२९) आणि शबनिम इस्माइल (३/२७) या वेगवान गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्याच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने शुक्रवारी इंग्लंडला सहा धावांनी पराभवाचा धक्का देत महिला ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेची प्रथमच अंतिम फेरी गाठली.**





उपांत्य फेरीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना यजमान दक्षिण आफ्रिकेने २० षटकांत ४ बाद १६४ अशी धावसंख्या केली. प्रत्युत्तरात इंग्लंडला १८ चेंडूंत २८ धावांची आवश्यकता होती. त्यावेळी अयाबोंगा खाकाने तीन धावांच्या मोबदल्यात तीन गडी बाद करत सामना दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने वळवला. इंग्लंडचा डाव २० षटकांत ८ बाद १५८ धावांवर मर्यादित राहिला.

तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या आफ्रिकेसाठी ब्रिट्स आणि वोल्व्हार्ड यांनी ९६ धावांची सलामी दिली. ब्रिट्सने ६८ धावांच्या खेळीत ६ चौकार व २ षटकार, तर वोल्व्हार्डने ५३ धावांच्या खेळीत ५ चौकार व १ षटकार मारला. ब्रिट्सला लॉरेन बेलने बाद केले. तर डावखुरी फिरकीपटू सोफी एक्लेस्टोनने वोल्व्हार्डसह आफ्रिकेच्या तीन फलंदाजांना माघारी पाठवले. मात्र, मॅरीझान कॅपने (१३ चेंडूंत नाबाद २७) फटकेबाजी केल्याने आफ्रिकेला १६० धावांचा टप्पा ओलांडता आला.

प्रत्युत्तरात डॅनी वॅट (३० चेंडूंत ३४) आणि सोफी डंकली (१६ चेंडूंत २८) यांनी इंग्लंडसाठी ५३ धावांची सलामी दिली. मात्र, या दोघी बाद झाल्यानंतर नॅट स्किव्हर-ब्रंट (३४ चेंडूंत ४०) आणि कर्णधार हेदर नाईट (२५ चेंडूंत ३१)

वगळता इंग्लंडच्या इतर फलंदाजांना फारसे योगदान देता आले नाही. त्यामुळे त्यांना पराभव पत्करावा लागला.

# १६व्या हंगामापूर्वी गुजरात टायटन्सला मोठा धक्का

## ‘या’ प्रमुख खेळाडूला झाली दुखापत

। गुजरात । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

आयपीएल सुरू होण्यास फारसा वेळ उरलेला नाही. कारण आयपीएलचा १६वा हंगाम ३१ मार्चपासून सुरु होणार आहे. मात्र ही लीग सुरू होण्याआधीच हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्सला मोठा धक्का बसला आहे. आयपीएल लिलावादरम्यान गुजरात टायटन्सने ४.४ कोटी रुपयांना विकत घेतलेला आयर्लंडचा स्टार वेगवान गोलंदाज जोश लिटल जखमी झाला आहे. तो सध्या सुरु असलेल्या पीएसएल २०२३ मधून बाहेर पडला आहे.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये झालेल्या आयपीएल लिलावादरम्यान गुजरातने लिटिलला विकत घेतले, जो लीगमधील पहिला आयरिश खेळाडू ठरला होता. २३ वर्षीय लिटल मुलतान सुलतान्ससाठी पीएसएलमध्ये सहभागी होणार होता. परंतु दक्षिण आफ्रिका टी-२० मध्ये प्रिटोरिया कॅप्सकडून खेळताना, त्याला हॅमस्ट्रिंगची समस्या जाणवली होती. त्यामुळे आता क्रिकेट आयर्लंडने सांगितले की, सावधगिरी बालगण्यासाठी तो मायदेशी परतला आहे.संभाव्य पुनरागमन म्हणून पुढील महिन्यात बांगलादेशमध्ये आयर्लंडच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेला लिटल लक्ष्य करत आहे. आयपीएल

